वाचा :-

1) महाराष्ट्र शासन,साप्रवि, शासन परिपत्रक क्र.ममाअ/2002/प्र.क्रं.127/02/5/ दि.14.08.2003.
2) महाराष्ट्र शासन, साप्रवि, शासन परिपत्रक क्र.केमाअ/2005/प्र.क्रं.190/05/5/ दि.१८.०६.२००५
3) महाराष्ट्र शासन, साप्रवि, शासन परिपत्रक क्र.केमाअ/2005/प्र.क्रं.430/05/5 दि.20.01.2006.
4) महाराष्ट्र शासन, साप्रवि, शासन परिपत्रक क्र.केमाअ/2006/प्र.क्रं.1/06/5/ दि.03.02.2006.
5) कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/आयुक्त कक्ष/१२६९०/२०२२ दिनांक.२२.०२.२०२२
6) कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/६२४६/२०२२ दिनांक ०४.०८.२०२२
7) कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/१५५०९/२०२३ दिनांक १५.०२.२०२३
8) कार्या.पत्र क्र.नांवाशमनपा/नरवि/२१६९/२०२३ दि.२३.०२.२०२३

**" सुधारीत आदेश "**

जा.क्र.नांवाशमनपा/साप्रवि/ 2156 /२०२३
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक :- 26 MAY 2023

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार २००५ हा संपुर्ण भारतात लागु झाल्यामुळे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत विविध विभागाची माहिती देण्यासाठी यापूर्वी संदर्भ क्र.०६ अन्वये सहाय्यक जनमाहिती अधिकारी/ जनमाहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांचे नियुक्ती बाबत आदेश निर्गमीत करण्यात आले होते.

तथापि संदर्भ क्र.०७ च्या आदेशामध्ये खालीलप्रमाणे अंशतः सुधारणा करुन विभागाच्या कामकाजात झालेल्या बदलानुसार प्रशासकीय कारणास्तव सहाय्यक जनमाहिती अधिकारी/जनमाहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभागाचे नांव | सहा.जन माहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1 | नगररचना विभाग | कनिष्ठ अभियंता/ इमारत निरीक्षक | श्री मनोहर शिवाजीराव दंडे, प्र.उपअभियंता, नगररचना विभाग | सहाय्यक संचालक नगररचना |

या आदेशाच्या दिनांकास यापूर्वी ज्या जनमाहिती अधिका-याकडे माहिती अधिकारातील प्रलंबीत प्रकरणे आहेत ती सर्व प्रकरणे माहितीसह नविन सहाय्यक जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी, अपीलीय अधिकारी यांचेकडे तात्काळ सुपुर्द करुन माहितीचे विवरण सामान्य प्रशासन विभागाकडे द्यावे.

तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी विभागाकडे प्राप्त होणारे माहिती अधिकार २००५ अंतर्गत अर्ज तसेच अपील अर्ज याबाबतची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे सादर करुन **जनमाहिती अधिकारी यांनी प्रत्येक आठवड्याच्या दर मंगळवारी आढावा बैठक घेऊन प्रकरणे निकाली काढावीत.**

जनमाहिती अधिकारी यांनी विभागात प्राप्त होणा-या अपिल प्रकरणात प्रत्येक महिण्याच्या दुस-या मंगळवारी सर्व अपीला बाबतची आढावा बैठक घेऊन **प्रत्येक महिण्याच्या दर बुधवारी अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील प्रकरणाची सुनावणी घेण्यात यावी. अपील प्रकरणाच्या सुनावणीसाठी स्वत: जनमाहिती अधिकारी यांनी अपीलीय अधिकारी यांचेकडे माहितीसह व अर्जदाराला दिलेल्या उता-यासह उपस्थित राहावे.** अपिलाचे सुनावणीचे वेळेस अपिलार्थीनी मागणी केलेल्या माहितीची संचिका, अभिलेखे संबंधीत अपिलार्थीस माहिती अधिकारा अंतर्गत मागणी प्रमाणे देण्यात आलेल्या माहितीसह उपस्थित राहावे.

अपीलीय अधिकारी यांनी प्रत्येक महिण्याच्या प्रत्येक बुधवारी माहिती अधिकारा अंतर्गत दाखल होणा-या अपिलाबाबतची सुनावणी घेऊन अपिल तात्काळ निकाली काढावे. **सबळ कारण नसतानां (३०)**

दिवसाच्या आत प्रकरण निकाली काढले नाही तर विनामोबदला दयावयचे छायांकीत प्रतीचा खर्च संबंधिताच्या पगारीतून वसुल करण्यात येईल.

तसेच जे सहाय्यक जनमाहिती अधिकारी/जनमाहिती अधिकारी, माहिती अधिकारा अंतर्गत दाखल होणारे माहितीचे प्रकरणे अथवा अपीलीय प्रकरणे विहित मुदतीत निकाली काढणार नाहीत त्यांचे विरुध्द केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत कलमान्वये प्रतिदिन रु. २५०/- दंड आकारला जाईल, माहिती द्यावयाचे ह्या प्रकारचे तिन पेक्षा जास्त प्रकरण झाल्यास किंवा निदर्शनास आल्यास संबंधिताविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकारातील प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रतिमहा शासनाकडे याबाबत पाठविण्यात येणा-या विहित प्रपत्रात माहिती भरुन दर महिण्याच्या 1 तारखेस सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावे.

माहिती अधिकारा अंतर्गत राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणा-या द्वितीय अपील प्रकरणातील सर्व संचिका, अभिलेखे व्यवस्थितपणे ठेवावेत जेणे करुन मा.राज्य माहिती आयुक्त यांचेकडे द्वितीय अपिल सुनावणीच्यावेळी संबंधीत जनमाहिती अधिकारी यांना माहिती देणे सोईचे होईल.

तसेच माहिती अधिकारातील प्राप्त होणारे अर्ज एक खिडकी योजना कक्षाद्वारे स्विकारण्यात येतील. सदर कक्षातील नियुक्त कर्मचा-यांनी प्रत्येक महिण्यास प्राप्त होणा-या माहिती अर्ज व अपील अर्जा बाबतचा अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडे विभाग निहाय सादर करावा.

सदरील आदेशाची अंमलबजावणी तात्काळ परिणामाने व्हावी.

स्वा/-
(डॉ.सुनिल लहाने)
आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत-
मा.राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद, यांना माहितीस्तव सविनय सादर.

<u>प्रतिलीपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-</u>

1) अतिरिक्त आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
2) नगररचना विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
3) संबंधित विभाग प्रमुख / शाखा प्रमुख, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
4) भांडार अधिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
5) सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, मनपा नांदेड यांना सुचित करण्यात येते की, सदर आदेश महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावा.
6) संबंधितांना (नावाने)

(डॉ.सुनिल लहाने)
आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

SM
39
26.05.23